| | | |
|---|---|---|
| | सायबर पोलीस ठाणे, सातारा<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा<br>मल्हार पेठ, सातारा, महाराष्ट्र<br>मोबाईल क्र. ९५५२९४११५१<br>ईमेल आयडी<br><cyberps.satara@mahapolice.gov.in> | |
| जा.क्र. २८२१ /२०२४ | | दि. - २९/१२/२०२४ |

# प्रेसनोट

## सायबर पोलीसांच्या सतर्कतेमुळे तक्रारदारांचे फसवणुक रक्कम अल्प कालावधीत परत प्राप्त झालेबाबत

सातारा जिल्हा पोलीस दलाचे मा.पोलीस अधिक्षक तुषार दोशी व मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांचे मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र सावंत्रे सायबर पोलीस ठाणे पोलीस अंमलदार यांनी ऑनलाईन सायबर क्राईम चे वाढते प्रमाण लक्षात घेता सामान्य जनतेची जनजागृती करण्यासाठी तसेच सायबर क्राईम संदर्भात घडणा-या प्रकारांवर वेळेत व परिणामकारक कारवाई करण्याबाबत आदेशीत केले आहे.

दिनांक २६/०७/२०२५ रोजी तक्रारदार अरूण शामराव यादव रा. संगमनगर, सातारा यांना अनोळखी नंबरवरून फोन येवून त्यानंतर त्यांचे बँक खात्यातून ओटीपीव्दारे २८,४९५/- रूपये फसवणुक झालेली होती. तक्रारदार हे सायबर पोलीस ठाणे येथे आलेनंतर त्यांना **१९३०/१९४५ या हेल्पलाईन नंबरवर तक्रार दाखल करण्यासाठी आवश्यक माहीती जसे की, ज्या बँक खात्यामुधन रक्कम गेली त्या बँक खात्याचा खाते नंबर, रक्कम डेबीट झालेची दिनांक, वेळ सदर रक्कमेचा ट्रान्झेक्शन आयडी व रेफरन्स नंबर ही सर्व माहीती तक्रारदार यांचेकडून प्राप्त करून घेवून १९३०/१९४५ या नंबरवर फोन करून तक्रार दाखल केली.** तक्रार दाखल झालेनंतर तक्रार नंबर प्राप्त करून तात्काळ संबंधीत बँकेशी संपर्क साधुन पुढील कारवाई केली. सदर कारवाईमुळे तक्रादाराची रक्कम परत मिळवून देता आली. तक्रारदार यांना बँकेत जावून तात्काळ Online Dispute Form भरण्याबबात सुचना दिल्या व त्या प्रमाणे त्यांनी कारवाई केली.

तक्रारदार यांची २८,४९५/- रूपये फसवणुक झालेली रक्कम ही १९३०/१९४५ या नंबरवर तात्काळ तक्रार दाखल केलेमुळे त्यांना रक्कम परत मिळाली. यावरून असे निदर्शनास येते की, **रक्कम किती मोठी किंवा छोटी आहे यापेक्षा तक्रार नोंदणी अत्यंत तात्काळ झाल्यास कितीही मोठी फसवणुक रक्कम १०० टक्के ा परत मिळवता येते ही बाब सर्व नागरीकांनी लक्षात ठेवावी.**

मा. वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे व पोलीस अंमलदार यांनी तात्काळ कारवाई केली. सदर कारवाईमध्ये सायबर पोलीस ठाणेचे अमंलदार माधुरी बाचल, अतुला तावरे, वर्षा खोचे, सुप्रिया रोमण, सिमा भुजबळ यांनी सदरची कारवाई केलेली असून कारवाईत सहभागी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मा. श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा व मा. डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

**पोलीस अधीक्षक सातारा, करीता**